श्रीदत्त.

॥ श्रीभगवद्‌गीतेचा विशुद्ध कर्मयोग ॥

प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर.

"मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥"
अ. ३:३०

अर्जुनाला, युद्ध कसे करावे? या बद्दल हा श्री भगवंतांचा उपदेश जरी असला तरी "सर्वाणि कर्माणि" या उपक्रमावरून तो सर्वकर्मसाधारण आहे असे समजण्यास हरकत नाही.

"कर्मयोगाची चतुःसूत्री" या श्लोकात श्रीभगवा(न्) सांगत असल्याने हा श्लोक अत्यंत महत्त्वाचा, अविस्मरणीय असा आहे.

१) ईश्वरार्पण बुद्धी

२) फलेच्छा त्याग

३) कर्तृत्वाभिमान त्याग आणि

(८) फलसिद्धी व असिद्धी यांबद्दल समबुद्धी हे कर्मयोगाचे मुख्य चार सिद्धांत आहेत.

(९) ईश्वरार्पणबुद्धी : सर्व हृदयस्थ परमात्म्याची बुद्धिप्रेरक असल्यामुळे व फलसिद्धीही त्याच्याच आधीन असल्याने, आपणाकडून होणाऱ्या लहान मोठ्या सर्व कर्मांना आपण फक्त निमित्त आहोत. " केनापि देवेन हृदि स्थितेन यथा नियुक्तोऽस्मि तथा करोमि " ही दृढभावना कर्म करताना राहणे ही "ईश्वरार्पणबुद्धी" होय. अशी बुद्धी ठेवून होणारी कोणतीही कर्मे, पुनर्जन्माला कारण न होता, ती ~~आशय~~ अत्यंत शुद्ध ठरतात. त्यात उच्च-नीच भाव राहत नाही. " कर्मशुद्धिर्मदर्पणम् " असे श्री भगवंतांनी याबद्दल उद्धवाला सांगितले आहे.

2. फलेच्छा त्याग :- हा वरील श्लोकात "निराशी: ~~भूत्वा~~ भूत्वा" या पदांनी सूचविला असून श्लोकाच्या पूर्वार्धात ईश्वरार्पणबुद्धि सांगितली आहे. फलाकांक्षेला शेख महंमदाप्रमाणे मन ~~~~ अग्र झाल्यास, कर्माकडे - प्रयत्नाकडे असावे तसे लक्ष राहू शकत नाही त्यामुळे शैथिल्य, स्खलन होण्याचा संभव असतो, आणि शेवटी फळ मिळाले नाही किंवा मनासारखे मिळाले नाही तर दु:ख होते म्हणून फलसिद्धी स्वामींच्या इच्छेवर अवलंबून आहे. स्वामींच्या आज्ञेप्रमाणे कर्तव्यकर्म करणे एवढेच सेवकाकडे आहे. अशा विचाराने अंत:करण निष्काम ठेवण्याचा प्रयत्न करणे हे कर्मयोगाचे दुसरे सूत्र अंग होय.

(३) "कर्तृत्वाभिमानत्याग" हे "निर्ममः भूत्वा" या पदांनी सुचविले आहे. मी यात भाग घेतला, मी प्रयत्न केला म्हणून हे काम यशस्वी झाले, असा अहंकार कर्मासंबंधी उत्पन्न होणे घातक आहे. यामुळे फलदात्याबद्दल "कृतज्ञता" बुद्धिच नष्ट होते आणि राग-द्वेषादि दोषांमुळे अशांती निर्माण होते आणि ते कर्म शेवटी बंधक ठरते. याकरिता पहिली ईश्वरार्पण बुद्धी दृढ झाली असता, फलेच्छा व कर्तृत्वाभिमान हे दोन दोष आपोआपच नाहीसे होऊन अंतःकरण प्रशांत होते व यामुळे ते कर्म अत्यंत विशुद्ध ठरते.

(४) "फलासिद्धी वा असिद्धी" याबद्दल साम्यबुद्धी.

४) "सिध्द्यसिध्द्यो:

"सिध्द्यसिध्द्यो: समत्वम्" हे चौथे अंगही आवश्यक आहे. म्हणजे फलसिध्दी झाल्याने हर्ष अथवा फळ न मिळाल्यास विषाद हे दोन्हीही विकार उद्भवत नाहीत आणि "होईल अनंत तैसेचि रहावे चित्ती असो द्यावे समाधान" ही अवस्था आपोआप प्राप्त होते.

असा हा कर्मयोग चौरंगी असल्याने, हा अभ्यास करताना, भगवद्भक्ती, विवेकज्ञान, तितिक्षा इत्यादी प्रधान साधनांचाही अभ्यास होऊ शकतो आणि तो कर्मयोगी ईशकृपेने भक्ति ज्ञान सामर्थ्येही हळुहळू परिपक्व बुध्दीचा होऊ शकतो हे कर्मयोगाचे महत्व आहे.

8 am प्रस्तुत वासुदेवानंद सरस्वती धर्मशाळा हे

9 हे अध्यात्मिक कर्मयोगाचे फल ईश्वरेच्छेनुसार

10 सर्वांपुढे उभे आहे. यात भाग घेणारे

11 सर्वच सज्जन ईश्वर कृपा पात्रता संपादन करोत,

12 noon निष्काम मानव जन्म उत्तम प्रकारे सफल करतील

1pm अशी आशा आहे.

2 "स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः"
१८:४६

3 या भगवद् आदेशानुसार, भारत वर्ष अशा

4 कर्मयोगाने समृद्ध होवो हीच

5 जगदीश्वराच्या चरणी प्रार्थना

रामनवमी

6 १९०१

18 Sunday पुणे १९८६

evening